प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

डिसेंबर 21, 2016

## आरबीआयकडून पाच अधिकृत डीलर बँकांना आर्थिक दंड लागु

विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, 1999 च्या (फेमा) अहवाल पाठविण्याच्या आवश्यकतांवरील भारतीय रिझर्व बँकेच्या सूचनांचे उल्लंघन केले असल्याकारणाने पुढील पाच बँकांना भारतीय रिझर्व बँकेने दंड ठोठावला आहे. दंडाच्या रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अनुक्रमांक | बँकेचे नाव | दंडाची रक्कम (रु. मध्ये). |
|---|---|---|
| 1. | बँक ऑफ अमेरिका | 10,000 |
| 2. | बँक ऑफ टोकियो, मित्सुबिशी | 10,000 |
| 3. | डॉयश बँक | 20,000 |
| 4. | दि रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड | 10,000 |
| 5. | स्टॅंडर्ड चार्टर्ड बँक | 10,000 |

भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचना/निदेश/मार्गदर्शक तत्वांचे केलेले उल्लंघन विचारात घेऊन, फेमा 1999 च्या कलम 11(3) च्या तरतुदींखाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने हे दंड ठोठावले आहेत.

रिझर्व बँकेने वरील बँकांना कारणे दाखवा नोटिसा पाठविल्या होत्या व त्यांच्या उत्तरादाखल, वरील बँकांनी त्यांची लेखी उत्तरे व मौखिक सादरीकरणेही सादर केली होती. ह्या प्रकरणांमधील सत्य गोष्टींचा विचार करुन रिझर्व बँक ह्या निर्णयाप्रत आली की उल्लंघने झाली असून दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/1604** सहाय्यक सल्लागार